# University of Mumbai

संलग्नता/मान्यता विभाग
क्र. संलग्नता/आय.सी.एम./२०१६–१७/११५५
६ सप्टेंबर, २०१६

प्रती,
प्राचार्य, सर्व विधी महाविद्यालये,
मुंबई विद्यापीठ.

विषयः– विधी प्रवेश प्रक्रिया सन २०१६–१७ करिता महाविद्यालय सुरू ठेवणेबाबत.

संदर्भः– शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) क्र. उशिसं/विधी/ २०१६–१७/ १०३६३ दिनांक ०३ सप्टेंबर, २०१६.

शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्या उपरोक्त संदर्भिय पत्रानुसार आपणांस कळविण्यात येते की, उपरोक्त विषयी विधी ३ आणि ५ वर्षे अभ्यासक्रम सन २०१६–१७ या शैक्षणिक वर्षासाठी विद्यार्थ्यास महाविद्यालय पसंती प्राधान्यक्रम अर्ज भरणेची मुदत दि. ०३.०९.२०१६ ते दि. ०८.०९.२०१६ अशी आहे. तद्नंतर विद्यार्थ्यांसाठी प्रथम प्रवेश फेरी ऑनलाईन पध्दतीने दिनांक १२.०९.२०१६ रोजी होणार आहे. सदर प्रवेश फेरीमध्ये गुणानुक्रमे/ पसंतीक्रमानुसार महाविद्यालय मिळालेल्या (Alloted) विद्यार्थ्यांस महाविद्यालयात दि. १९.०९.२०१६ पर्यत प्रवेशित करावयाचे आहे. सबब, दि. ०३.०९.२०१६ पासून विद्यार्थ्यांस महाविद्यालय पसंती प्राधान्यक्रम अर्ज भरण्यासाठी मार्गदर्शन करणे व आपल्या महाविद्यालयात केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीयेमार्फत प्रवेश घेणा–या विद्यार्थ्यांस प्रवेश देण्यासाठी आपले महाविद्यालय दि. ०३.०९.२०१६ ते दि. १९.०९.२०१६ पर्यत सुट्टीच्या दिवशीदेखील सुरू ठेवण्यात यावे. तसेच सन २०१६–१७ साठी केंद्रीभूत सामाईक प्रवेश प्रक्रियेबाबत विद्यार्थ्यांस मार्गदर्शन करण्यासाठी आपल्या महाविद्यालयातील माहितगार व्यक्तीची नेमणूक करण्यात यावी. उपरोक्त नमुद कालावधीत आपले महाविद्यालय सुरू नसल्यामुळे विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहिल याची नोंद घेण्यात यावी. (प्रत संलग्न)

आपला विश्वासू,

(डॉ. दिनकर पवार)
उपकुलसचिव
संलग्नता/मान्यता विभाग

# महाराष्ट्र शासन

## शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)

## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१.

Web:www.dhepune.gov.in E-mail : mavi.dhepune@nic.in

फोन नं. ०२०/२६०५१७२९,२६१२२११९,२६०५१५१२, फॅक्स नं.०२०/२६१११११५३

क्रमांक-उशिसं/विधी/२०१६-१७/ १०३६३ दिनांक ०३.०९.२०१६

प्रति,

प्राचार्य, सर्व विधी महाविद्यालये,
महाराष्ट्र राज्य.

विषय : विधी प्रवेश प्रक्रिया सन २०१६-१७ करीता महाविद्यालय सुरु ठेवणेबाबत . . .

उपरोक्त विषयी, विधि - ३ व ५ वर्षे अभ्यासक्रम सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षासाठी विद्यार्थ्यांस महाविद्यालय पसंती प्राधान्यक्रम अर्ज भरणेची मुदत दि. ०३.०९.२०१६ ते दि. ०८.०९.२०१६ अशी आहे. तद्नंतर विद्यार्थ्यांसाठी प्रथम प्रवेश फेरी ऑनलाईन पध्दतीने दि. १२.०९.२०१६ रोजी होणार आहे. सदर प्रवेश फेरीमध्ये गुणानुक्रमे / पसंतीक्रमानुसार महाविद्यालय मिळालेल्या (Alloted) विद्यार्थ्यांस महाविद्यालयात दि. १९.०९.२०१६ पर्यंत प्रवेशित करावयाचे आहे. सबब, दि. ०३.०९.२०१६ पासून विद्यार्थ्यांस महाविद्यालय पसंती प्राधान्यक्रम अर्ज भरण्यासाठी मार्गदर्शन करणे व आपल्या महाविद्यालयात केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीयेमार्फत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांस प्रवेश देण्यासाठी आपले महाविद्यालय दि. ०३.०९.२०१६ ते १९.०९.२०१६ पर्यंत सुट्टीच्या दिवशीदेखील सुरु ठेवण्यात यावे. तसेच सन २०१६-१७ साठी केंद्रीभूत सामाईक प्रवेश प्रक्रियेबाबत विद्यार्थ्यांस मार्गदर्शन करण्यासाठी आपल्या येथील माहितगार व्यक्तींची नेमणूक करण्यात यावी. उपरोक्त नमुद कालावधीत आपले महाविद्यालय सुरु नसल्यामुळे विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील याची नोंद घेण्यात यावी.

( डॉ. धनराज माने )
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे - १.

प्रत –

१. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.
   २/- यांना कळविण्यात येते की, आपले विद्यापीठाशी संलग्नित विधी महाविद्यालये दि. ०२.०९.२०१६ ते १६.०९.२०१६ पर्यंत सुट्टीच्या दिवशीदेखील सुरु ठेवण्याबाबत महाविद्यालयास आपल्या स्तरावरुन निर्देश देण्यात यावेत.

प्रत माहितीस्तव सविनय सादर –

१. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई – ३२.
२. मा. आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, ३०५ शासकीय तंत्रनिकेतन, अली यावर जंग मार्ग, बांद्रा (पूर्व) मुंबई - ४०० ०५१.